RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष २, अंक ११२] शुक्रवार, डिसेंबर २३, २०१६/पौष २, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १६९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ डिसेंबर २०१६.

**अधिसूचना**

**स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६.**

क्रमांक स्थासंअ. २०१६/प्र. क्र. ७९/डीव्हीपी-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) (स्थावर संपदा प्रकल्पांची नोंदणी, स्थावर संपदा एजंटची नोंदणी, व्याजदर आणि संकेतस्थळावर, त्यांचे प्रकटन नियम, २०१६ या प्रस्तावित नियमावरील हरकती किंवा सूचना, **महाराष्ट्र शासन असाधारण, राजपत्र** दिनांक ८ डिसेंबर २०१६ च्या अधिसूचना क्रमांक १६१ द्वारे, दिनांक २३ डिसेंबर २०१६ रोजी किंवा त्यापूर्वी मागविण्यात आल्या आहेत.

ज्याअर्थी, उक्त नियमांबाबतच्या हरकती किंवा सूचना सादर करण्याच्या दिनांकाची मुदत वाढविणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ याच्या कलम ८४ ची पोट-कलमे (१) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे हरकती किंवा सूचना सादर करण्याच्या दिनांकास, दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत मुदतवाढ देत आहे.

उक्त मसुद्याबाबत, उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना एकतर *suggesstionsonrera@maharashtra.gov.in* या ई-मेलवर किंवा टपालामार्फत अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्राप्त होतील, त्यावर शासन विचार करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 23rd December 2016

*NOTIFICATION*

THE REAL ESTATE (REGULATION AND DEVELOPMENT) ACT, 2016.

No. REA. 2016/C.R. No. 79/DVP-2.—Whereas by Notification No. 161 in *Extraordinary Gazette*, dated 8th of December 2016 of the Government of Maharashtra has invited objections or suggestions for Rules proposed as Maharashtra Real Estate (Regulation & Development) (Registration of Real Estate Projects, Registration of Real Estate Agents, Rates of Interest and Disclosures on Website) Rules, 2016, on or before 23rd December, 2016.

Whereas, it is expedient to extend the date of submission of objections or suggestions to the said rules now, therefore, in exercise of powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 84 of the Real Estate (Regulation and Development) Act, 2016 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby extends the date of submission of objections or suggestions upto 31st December 2016.

Any objections or suggestions either through e-mail *viz. suggesstionsonrera@maharashtra.gov.in* or in post, which may be received by the Additional Chief Secretary, Housing Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. K. DHANAWADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.